# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०२५

## प्रसिद्धी निवेदन

शासन निर्णय **दिनांक २३ ऑगस्ट, २०१३** अन्वये शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) - २०२५** परीक्षेचे आयोजन रविवार **दि. २३/११/२०२५** रोजी करण्यात आले होते.

**महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) - २०२५** पेपर क्र. १ व पेपर क्र. २ ची अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या **https://mahatet.in** या अधिकृत संकेतस्थळावर **दि. १९/१२/२०२५ रोजी** प्रसिध्द करण्यात येत आहे.

परीक्षेसाठी पेपर क्र. १ व पेपर क्र. २ बाबत प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/आक्षेप असल्यास परिषदेकडे **दि. १९/१२/२०२५ ते दि. २७/१२/२०२५** अखेरपर्यंत पाठवता येतील. सदर आक्षेप/त्रुटी बाबतचे निवेदन पुराव्यासह **https://mahatet.in** या संकेतस्थळावर परीक्षार्थ्यांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आक्षेप नोंदणी या लिंकद्वारे परिषदेकडे पाठवता येतील. आक्षेपाबाबत लेखी निवेदन समक्ष/टपालाने/ईमेलद्वारे पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

(विहित मुदतीत ऑनलाईन रित्या प्राप्त झालेल्या आक्षेपाचा विचार करुन विषय तज्ञांच्या अभिप्रायानुसार अंतिम उत्तरसूची यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४

**स्थळ :** पुणे
**दिनांक :** १९/१२/२०२५

Scanned with OKEN S